# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक २९ डिसेंबर, २०२२

## (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजेपर्यंत)

**(क) (मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२, बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२, गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२, शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ व सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२, मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ व बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** चंद्रशेखर बावनकुळे, प्रसाद लाड, सुरेश धस, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, निलय नाईक, प्रा. राम शिंदे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री रामराव पाटील, अमरीश पटेल, श्रीकांत भारतीय, प्रविण पोटे-पाटील, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दटके, रमेश कराड, वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्री. राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

"महाविकास आघाडी सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येणे, राज्यात विदर्भ, मराठवाडा व कोकणासह उर्वरित अविकसित भागाचा संतुलित विकास होण्याची आवश्यकता, नैसर्गिक व सेंद्रिय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्रा उद्योग, दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन इत्यादी शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देऊन अधिकाधिक रोजगार उपलब्ध करणे, कृषीमालावर आधारीत प्रक्रिया उद्योग उभारणे, धानावर प्रक्रिया उद्योग उभारणे, विदर्भ आणि मराठवाड्यातील तिर्थक्षेत्र व पर्यटनस्थळांचे जाळे तयार करून रोजगार निर्मिती वाढविणे, विदर्भातील कापूस उत्पादनावर आधारीत सूत गिरण्या व कापूस उद्योगाला चालना देणे, विदर्भ व मराठवाड्यात खनिज व जंगल संपत्ती मोठ्या प्रमाणात असल्याने त्याचा अधिकाधिक फायदा जनतेला मिळण्याच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञान विकसित करणे, विदर्भातील विशेषत: अमरावती व मेळघाट येथे आधुनिक सोयीसुविधा युक्त रुग्णालयांची निर्मिती करून कुपोषणामुळे होणारे बालकांचे मृत्यू टाळण्याची आवश्यकता, राष्ट्रीयकृत बँकांच्या तुलनेत सहकारी बँकांची जिल्ह्या-जिल्ह्यात सहज उपलब्ध होणारी सेवा विचारात घेता सहकारी बँकांवरचे वाढते निर्बंध शिथील करण्याची आवश्यकता, राज्यातील गड-किल्ल्यांचे जतन करून त्यांच्या संवर्धनाकरीता विशेष निधी

अप्रकाशित प्रत

उपलब्ध करणे व राजे शिवछत्रपतींचा इतिहास पर्यटकांसमोर मांडण्याची आवश्यकता, राज्यातील १२ बलुतेदारांसाठी एमआयडीसीमध्ये कौशल्य विकास केंद्राचे जाळे उभारून ग्रामीण भागातील बलुतेदारांना त्यांच्या व्यवसायांत आयटीआयच्या धर्तीवर तंत्रशिक्षण देऊन त्यांच्या उद्योगात आधुनिकता आणण्याची आवश्यकता, केंद्र शासनाचे नदीजोड प्रकल्प प्रभावीपणे कार्यान्वित करण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना बारमाही पाणी उपलब्ध करून त्यांच्या उत्पादनास चालना देण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा अधिक प्रभावी करण्याकरीता या योजनेच्या अटी व निकष शिथील करणे, विदर्भ व मराठवाड्यासह राज्यातील बेरोजगार युवकांची वाढती संख्या विचारात घेता मिहान प्रकल्प व अन्यत्र जड उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योग, ऑटोमोबाईल प्रकल्प सुरू करण्याची आवश्यकता, राज्यातील सर्व जिल्ह्यांत पर्यावरणाचा धोका टाळण्यासाठी अधिकाधिक वृक्षलागवड करण्याची आवश्यकता, सन २०२२-२३ हे मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून राज्य शासनाच्या वतीने साजरे करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

(ख) **(गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२, शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ व सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२, मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ व बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री अंबादास दानवे**, एकनाथराव खडसे, अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.अनिल परब, सर्वश्री विक्रम काळे, सतेज उर्फ बंटी पाटील, नरेंद्र दराडे, सतीश चव्हाण, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री विलास पोतनीस, अब्दुलाखान दुर्राणी, अभिजीत वंजारी, डॉ. मनिषा कायंदे, सर्वश्री अनिकेत तटकरे, राजेश राठोड, सुनिल शिंदे, अमोल मिटकरी, वजाहत मिर्झा, जयंत आसगावकर, सचिन अहिर, अरुण लाड, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री आमश्या पाडवी, विप्लव बाजोरीया, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

"राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अविकसित भागाचा झपाट्याने विकास होण्याच्या दृष्टीने योजनांच्या अंमलबजावणीत सातत्य दाखविण्याची नितांत आवश्यकता असणे, दरवर्षी नागपूर अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्याच्या कृषि, सिंचन, शिक्षण इत्यादी अनुशेषाबाबत चर्चा होणे, तथापि, अनुशेष दूर करण्यासाठी ठोस कार्यवाही न होणे, विदर्भातील मुख्य फळपीक असलेल्या संत्रा पिकासाठी अमरावती जिल्ह्यातील वरुड-मोर्शी तालुक्यात अत्याधुनिक संत्रे प्रक्रिया प्रकल्प स्थापन करण्याच्या निर्णयाची, मराठवाडा व

आसपासच्या भागातील मोसंबी पिकाची गुणवत्ता व उत्पादकता वाढविण्याकरिता "सायट्रस इस्टेट" स्थापन करण्याच्या निर्णयाची, औरंगाबाद जिल्ह्यातील चिखलठाणा येथे अंडीपुंज निर्मिती केंद्र निर्माण करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकडे शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज असणे, विदर्भ व मराठवाड्यातील कापूस व सोयाबीन मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजनेची धडक अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या काळात अतिवृष्टी, पूर, सततचा पाऊस व अवकाळी पाऊस यामुळे राज्यातील कापूस, सोयाबीन, तूर, मूग या पिकांचे तसेच संत्री, मोसंबी, डाळींब, द्राक्ष या फळपिकांचे नुकसान झाले असणे, ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या केलेल्या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केलेले असणे, त्याऐवजी तुटपुंजी मदत जाहिर करून अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदतही अद्याप मिळालेली नसणे, सरकारच्या उदासीनतेमुळे पीक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचे लाखो दावे नाकारुन केलेली फसवणूक, विदर्भात कापसावर लाला रोगाचा व संत्र्यावर कोळश्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे प्रचंड नुकसान झाले असणे, राज्य व केंद्र सरकारच्या चुकीच्या कृषी धोरणांमुळे व मदतीचा हात आखडता घेतल्याने माहे जुलै, २०२२ पासून ६ महिन्यांच्या काळात सुमारे दीड हजार शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपवली असणे, "शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र" ही सरकारची घोषणा हवेत विरली असणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या सन २०१५ ते २०२० या कालावधीसाठी एनडीआरएफचे निकष निश्चित केले असताना व सन २०२१ मध्ये निकषात वाढ अपेक्षित असताना २ वर्षांचा काळ उलटून गेल्यानंतरही केंद्र सरकारने निकषात वाढ केली नसणे, परिणामी शेतकऱ्यांना एनडीआरएफ व एसडीआरएफमधून तुटपुंजी मदत मिळत असणे, धान खरेदी केंद्र सुरु करण्यास झालेला अक्षम्य विलंब, धान खरेदीत झालेले घोटाळे, यामुळे अनेक शेतकऱ्यांचा धान विक्रीअभावी पडून असणे, गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड प्रकल्पामुळे आपल्या राज्यातील खनिज प्रक्रिया करण्यासाठी अन्य राज्यात जात असणे, मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासंदर्भात सरकारकडून बेफिकीरी व अनास्था दिसून आलेली असणे, मागील सरकारने केलेल्या कार्यक्रमाचे नियोजन व निधीची तरतूद याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करुन कार्यक्रम अंमलबजावणीत उदासीनता दाखवली असणे, मुक्तीसंग्राम दिनी महाराष्ट्र शासनामार्फत कोणताही भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन न केल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेत तीव्र संतापाची लाट पसरली असणे, मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रलंबित प्रश्नांचा तातडीने निपटारा करण्याची आवश्यकता, एम.आय.डी.सी. अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्यामुळे संबधित अधिकारी मॅट मध्ये जावून उक्त बदल्या रद्द केल्याने यामध्ये शासनास आलेले अपयश, राज्याच्या इतर भागात होणाऱ्या ९२ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या व जमीन वाटपाच्या आदेशाला विद्यमान सरकारने स्थगिती दिल्यामुळे राज्यात येणारे प्रकल्प रखडले असणे, महाराष्ट्राचे उद्योग परराज्यात जाणे हे सरकारवर उद्योग

जगताचा विश्वास नसल्याचे स्पष्ट होणे, शासनाच्या उदासिनतमुळे वेदान्त फॉक्सकॉन, टाटा एअर बस, बल्क ड्रग पार्क अश्याप्रकारे बरेच प्रकल्प राज्याबाहेर जाणे, यातून एम.आय.डी.सी च्या उच्चाधिकार समितीची निष्क्रियता दिसून येणे, उद्योग मंत्र्यांनी शासनाचे अपयश लपविण्यासाठी राज्याबाहेर जाणाऱ्या उद्योगाबाबत मागील शासनावर जबाबदारी निश्चित करणे, मिहान प्रकल्पात ५५ गुंतवणुकदारांबरोबर करार झाला असताना फक्त ११ कंपन्या कार्यरत झाल्या असणे व फक्त ५९२५ रोजगार निर्मिती झाली असणे, मिहान प्रकल्पासारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, विदर्भातील बुटीबोरी, मिहान सारख्या औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योगांची पिछेहाट झालेली असणे, विदर्भ, मराठवाड्यात उद्योग व गुंतवणूक आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज, विदर्भ, मराठवाडा, व उर्वरित महाराष्ट्रातील आकांक्षित जिल्ह्यासाठी जलसिंचन सुविधा पुनरुज्जीवीत करण्यासाठी अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेला नियतव्यय प्राधान्याने वितरित करण्याची आवश्यकता असणे, वैनगंगा-पैनगंगा प्रकल्पाचा आराखडा मागील सरकारने पूर्ण करुनही या सरकारने सहा महिन्यात काहीही प्रगती न करणे, बळीराजा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इत्यादी जलसंपदा विभागाच्या विदर्भातील योजना गेल्या सहा महिन्यात ठप्प होणे, विदर्भातील सिंचनाच्या सर्व प्रशासकीय बाबी या सहा महिन्यात प्रलंबित राहिल्या असणे, राज्यातील ओबीसी, मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या वसतीगृह व शिष्यवृत्तीचा प्रश्न निर्माण झालेला असणे, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अतिदुर्गम भागात विशेषत: विदर्भातील अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर इत्यादी जिल्ह्यात बालमृत्यू व कुपोषणाचे प्रमाण सर्वाधिक असणे, राज्यात महिला व अल्पवयीन मुलीवरील अत्याचारात दिवसेंदिवस होत असलेली वाढ, गत नऊ महिन्याच्या कालावधीत महिलांवरील अत्याचारामध्ये २३५ टक्के तर विनयभंगाच्या घटनांमध्ये १७२ टक्क्यांनी वाढ झाल्याचे समोर येणे, दिवसेंदिवस गुन्ह्यांमध्ये वाढ होत असतांनाही याबाबत शासन गंभीर नसणे, परिणामी गुन्ह्यांमध्ये होत असलेली वाढ, तसेच गुन्हे निकाली काढण्यास होत असलेला विलंब, वाढत्या गुन्हेगारीस आळा बसण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अप्रकाशित प्रत

**(ग) (मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ व बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) – (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) –**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** चंद्रशेखर बावनकुळे, रामदास आंबटकर, प्रविण दटके, प्रसाद लाड, गोपिचंद पडळकर, प्रा. राम शिंदे, श्री. श्रीकांत भारतीय, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री रमेश कराड, नागोराव गाणार, रमेशदादा पाटील, निलय नाईक,

रणजितसिंह मोहिते-पाटील, राजहंस सिंह, वसंत खंडेलवाल, रामराव पाटील, निरंजन डावखरे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री सुरेश धस, प्रविण पोटे-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"केंद्र शासनाने पेट्रोल, डिझेलच्या विक्रीकरात कपात केल्यानंतरही मागील सरकारच्या कार्यकाळात राज्य शासनाने अन्य राज्यांप्रमाणे पेट्रोल व डिझेलच्या दरात कपात करण्यात आडमुठे धोरण अवलंबणे, परिणामी राज्यातील गोरगरीब जनतेला महागाईचे चटके सहन करावे लागणे, विद्यमान शासन सत्तेवर येताच पेट्रोल व डिझेलवरील विक्रीकरात कपात करण्यात येणे, मागील सरकारने प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु.५० हजार देण्याची घोषणा सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात व २०२१ मध्ये करूनही या घोषणेची अंमलबजावणी न होणे मात्र, विद्यमान शासनाच्या कार्यकाळात शेतकरी हित लक्षात घेऊन रु.५० हजारचा निधी तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला असणे, मागील शासनाच्या काळात सरसकट शेतकऱ्यांची वीज कापण्याची मोहीम राबविण्यात आली असताना विद्यमान शासनाच्या काळात उपमुख्यमंत्री महोदयांनी शेतकऱ्यांची वीज कापू नये असे आदेश निर्गमित करून शेतकऱ्याचा प्राधान्याने विचार केला असणे, मागील सरकारच्या काळात काही विशिष्ट मतदार संघात निधीचे असमान वाटप करण्यात आले असताना विद्यमान शासनाच्या काळात सर्वांना समान निधी वितरित करण्याचे धोरण आखण्यात येणे, शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमाचे प्राध्यापक व ग्रंथपाल यांच्या वेतनवाढीचा विचार होण्याची आवश्यकता, सन २००१ च्या पूर्वीची बीपीएड आणि कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत विचार होण्याची आवश्यकता, म्हाडाकडून पुनर्विकास होणाऱ्या इमारतीतील रहिवाशांना तसेच झोपडीधारकांना विकासकाविरुद्ध महारेरामध्ये अपिल करण्याचा अधिकार देण्याची आवश्यकता, इमारत पुनर्विकास करताना केलेल्या कराराप्रमाणे तेथील भाडेकरुंना पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होईपर्यंत बऱ्याच विकासकांकडून भाडे देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, पुनर्विकास करावयाच्या इमारतींचा तात्काळ विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील नेहरूनगर व टिळक नगर म्हाडा वसाहतीतील पुनर्विकसित इमारतींना १० ते १५ वर्षे उलटूनही अद्याप भोगवाटा प्रमाणपत्र (ओसी) न मिळणे, जिल्हाधिकाऱ्यांच्या हद्दीतील जमिनींवरील धारणाधिकार रुपांतरीत करण्याकरीता आकारण्यात येणारे शुल्क जीर्ण इमारतींच्या बाबतीत २.५ टक्के करण्याची आवश्यकता, पीडब्ल्यूआर-२०१९ योजनेतंर्गत एससी, एसटी, एनटी समाजाला दिलेल्या जमिनी फ्रीहोल्ड करण्याकरीता संबंधीत समितीचे गठण तात्काळ होण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे हद्दीतील अनेक वर्षे जुन्या झोपडीधारकांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेत काही पदांवर अधिकारी त्याच-त्याच ठिकाणी दिर्घकाळ कार्यरत असल्याची बाब निदर्शनास येणे, अशा भ्रष्ट अधिकाऱ्याची चौकशी

अमुद्रित प्रत

करण्याची आवश्यकता, मुंबईचा रखडलेला विकास करण्याकरीता नियोजन आराखड्याची वेगाने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(क) बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री. विक्रम काळे व इतर वि.प.स. यांचा "मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १६१५७**

**(ख) तारांकित प्रश्न**

**दोन : "अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे."**

**तीन : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्रीमती उमा खापरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासकीय सेवेत असताना किंवा निमशासकीय सेवेत असताना अथवा सेवा निवृत्त वेतनाचा लाभ घेत असलेल्या आई-वडिलांच्या निधनानंतर वारसा हक्काने त्यांच्या पश्चात अविवाहित किंवा घटस्फोटीत किंवा दिव्यांग / मानसिक दृष्ट्या सक्षम नसणाऱ्या मुलींना त्यांच्या आई-वडिलांची पेन्शन मिळत नसल्याने अशा कुटुंबीयांचे होत असलेले आर्थिक हाल, यामुळे आई-वडिलांच्या निधनानंतर वारसा हक्काने त्यांच्या पश्चात मुलींना पेन्शन मिळण्याबाबतचे केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे राज्य शासनाकडून कार्यवाही होण्याबाबतची होत असलेली मागणी, याबाबत तातडीने कार्यवाही होऊन अशा मुलींना आर्थिक आधार देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

अप्रकाशित

**(२)** **ॲड. अनिल परब**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अंधेरी पूर्व, मरोळ, सहार आंतरराष्ट्रीय हवाई अडडा रोड, येथील व्यावसायिक विकास न.भू.क्र. (पैकी) १४२६, १५९० (पैकी ), १५४८, १५८८, १४६६, १४७७, १४५९, १४६२, १४७८, १४८२, १४९२, १४४९, १४८१ १४९४, १४९३, १४५५, १४६०, १४८०, १४६५, १४७४, १४५८, १४३२, १५५२, १५४९, १४७५, १४५४, १४५१, १४६१, १४२९, १४३१, १४७६, १५५०, १४२८, १४६३, १४५६, १४५३, १४३०, १४५२, १४६४ वरिल भूखंडावर मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पामध्ये मोठया प्रमाणात घोटाळा झाल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०२२ मध्ये उघडकीस येणे, सदरहू भूखंड हा मुंबईच्या विकास नकाशामध्ये सन १९९२ च्या पूर्वीपासून मनोरंजन मैदानाकरिता आरक्षित असणे, आरक्षणामध्ये उक्त भूखंड हा ५० टक्के मनोरंजन, ५० टक्के हॉटेलकरिता राखीव असतांना मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. यांनी जमीन कमाल नागरी कायद्यांतर्गत शासनाच्या अखत्यारितील भूखंडाला ना हरकत प्रमाणपत्र करिता केलेला अर्ज, त्याकरिता प्रिमियम शुल्क शासनाला भरल्यानंतर सदर हॉटेलचे बांधकाम सुरु करण्याची घातलेली बंधनकारक अट, परंतु मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. च्या मालकांनी शासनाचा प्रिमियम न भरता शासनाची अधिकृत परवानगी न घेता हॉटेलचे पूर्ण केलेले बांधकाम व महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे, मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. यांच्या भूखंडामधून ३.५ मीटरचा मोठा नाला असतांना मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. च्या मालकांनी महानगरपालिकेचे अधिकारी, युएलसीचे अधिकारी यांच्या संगनमताने गेल्या २२ वर्षापासून शासनाचे प्रिमियम पोटी भरावयाचे शुल्क बुडविले असणे, शासनाचे एकूण रुपये १,२५,५४,९५,०२१/- प्रिमियम शुल्क भरले नसल्याचे उघड होणे, जिल्हाधिकारी यांनी यासंदर्भातील आपला अहवाल शासनास सादर केल्यानंतर त्या आधारावर कायदा व सुव्यवस्था विभागांनी देखील आपला अहवाल शासनास सादर करणे, तदनंतर शहर विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी मंत्रीमहोदयांची मान्यता घेऊन जमीन कमाल नागरी धारणा (युएलसी) प्रिमियमची एकूण रुपये १,२५,५४,९५, ०२१/- माफ केलेली असणे, मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. च्या मालकांला युएलसी ची अट व शर्ती लागू होत्या त्याच अटी व शर्ती शेजारी असलेल्या भूखंडावरील हॉटेलवर असणे, आणि त्यांनी त्या अटीची पुर्तता केलेली असणे, शेजारच्या भूखंडामधून सुध्दा नाला जात होता पण त्यांनी महानगरपालिकेकडे रितसर परवानगी मागून ६.० मीटर रुंदीचा मार्ग सोडण्याची परवानगी घेणे, सदर भूखंड एअरपोर्ट ऑथोरिटी ऑफ इंडियाच्या जागेमधून जात असून वापरण्याकरिता करारनामा सादर केलेला नसणे, मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. च्या मालकांनी शासनाची व

अग्रिम प्रत

महानगरपालिकेची फसवणूक केलेली असणे, शासनाच्या नियमाचे उल्लंघन करुन केलेल्या बांधकामाची शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत स्थानिक नागरिकांच्या आलेल्या अनेक तक्रारी, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन यास जबाबदार असणाऱ्या मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. चे मालक, महापालिकेचे अधिकारी, तसेच शासनाचे अधिकारी यांच्याकडे कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(३) **श्री. नागोराव गाणार**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह येरवडा(नवीन), पुणे येथे सीसीटीव्ही खरेदीबाबत झालेल्या गैरप्रकारानंतर ई-लायब्ररी साहित्य खरेदीतही मोठा गैरप्रकार झाल्याचे माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले असणे, लायब्ररीसाठी खरेदी करण्यात आलेल्या साहित्याची जेम पोर्टलवर तपासणी केली असता प्रत्यक्षात चढ्या दराने खरेदी झाली असल्याचे समोर आलेले असणे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या निवासी शाळा व वसतिगृहांच्या सोयीसुविधेत वाढ करण्यासाठी नावीन्यपुर्ण योजनेअंतर्गत ३ टक्के निधी समाजकल्याण विभागाला उपलब्ध करून देण्यात आला असणे, त्या निधीतून सीसीटीव्ही कॅमेरे संच खरेदी करण्यात आले असणे, त्यामध्ये जवळपास ५० ते ५५ लाख रूपयांचा घोटाळा झाला असल्याचे प्राथमिकदृष्ट्या समोर आले असणे, या संदर्भात दिनांक ४ जानेवारी २०२२ रोजी अतिरिक्त आयुक्त समाजकल्याण आयुक्तालय यांनी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे कार्यालयास भेट दिली असता त्यांनी सीसीटीव्ही खरेदीसंदर्भात आक्षेप नोंदविणे, शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर योजनेचा समावेश, नावीन्यपुर्ण योजनेमध्ये होत नसल्याबाबत एकूण १२ निवासी शाळा/वसतिगृहांसाठी सुमारे ७४ लाख इतक्या रकमेचा पुरवठा आदेश देण्यात येणे म्हणजेच एका वसतिगृहाला सीसीटीव्हीसाठी रु. ६ लाखापेक्षा जास्त खर्च करण्यात येणे, सदरचा खर्च अवाजवी व बाजारभावाप्रमाणे नसल्याचे आक्षेप उपरोक्त भेटीदरम्यान नोंदविण्यात आले असणे, असे असताना पुन्हा सुमारे ४७ लाख रुपये खर्च करुन ई-लायब्ररीसाहित्य खरेदीतही घोळ झाल्याचे प्रकरण समोर येणे, ही खरेदी करतानासुद्धा सर्व नियमांची पायमल्ली करून अवास्तव दराने खरेदी करण्यात आली असल्याचा प्रकार समोर येणे, नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या इतर वस्तू जसे की सामान्य सेंटर इ. खरेदीत मोठा

अस्वाक्षरित प्रत

घोटाळा झाला असण्याची शक्यता व्यक्त केली जात असणे, सीसीटीव्ही खरेदी प्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली असतानाही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, तसेच सदरबाबत इतर संसदीय आयुधांमार्फत माहिती विचारण्यात आलेली असणे, परंतु तरीही विभागाने अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, नावीन्यपूर्ण योजनेअंतर्गत प्राप्त निधीबाबत सहाय्यक आयुक्त यांनी शासनाची फसवणूक केलेली असणे, सहाय्यक आयुक्त, पुणे यांनी जिल्ह्यातील वसतिगृहातील प्रवेशाचा विशेष कोटा भरताना उघडपणे गैरप्रकार केलेला असणे, सहाय्यक आयुक्त पुणे यांनी स्वाधार योजनेअंतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मुद्दाम लाभापासून वंचित ठेवलेले असणे, सहाय्यक आयुक्त पुणे यांनी स्कॉलरशीप वितरणाची मुद्दाम अडवणूक केलेली असणे, त्यामुळे शासनाने या विषयी करावयाची तातडीची कार्यवाही व उपयायोजना."

(४) **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अंधेरी, मुंबई येथील साकीनाका परिसरात प्लेसमेंट कार्यालय उघडून परदेशात नोकरीसाठी पाठवण्याचे प्रलोभन दाखवून बेरोजगार तरुणांना फसविणारी टोळी कार्यरत असल्याची बाब दि. ७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, या टोळीने आलिशान कार्यालय उघडून मुंबईतील अनेक बेरोजगार तरुणांना लाखो रुपयांना गंडा घातलेला असणे, या टोळीकडून एका प्लेसमेंट एजंटला माहे डिसेंबर, २०२० मध्ये फारइस्ट ड्रिलिंग प्रा. लि. कंपनीकडून परदेशांत नोकरीच्या संधी उपलब्ध असल्याचा ई मेल पाठविण्यात आला असणे, अनेक बेरोजगार तरुण संपर्कात असलेल्या या एजंटने सर्व बेरोजगार तरुणांची कागदपत्रे, पासपोर्ट व विविध शुल्कापोटी रोख रक्कम साकीनाका परिसरातील प्लेसमेंट कार्यालयात जमा केली असणे, परंतु गेल्या वर्षभरापासून या बेरोजगार तरुणांना परदेशात नोकरीस पाठविण्यास सदरहू कार्यालयाकडून टाळाटाळ सुरु असणे, त्यामुळे सरतेशेवटी रोख रक्कम परत मिळविण्यासाठी बेरोजगार तरुणांनी सदरहू प्लेसमेंट कार्यालय गाठले असता कार्यालय बंद करून टोळी गायब झाल्याची धक्कादायक बाब समोर येणे, त्यामुळे हवालदिल झालेल्या संबंधित बेरोजगार युवकांनी साकीनाका पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली असणे, या टोळीने मुंबई शहराच्या विविध भागात प्लेसमेंट कार्यालये उघडून अशाच प्रकारे अनेक बेरोजगार तरुणांची फसवणूक केली असल्याची दाट शक्यता असणे, त्यामुळे सदर प्रकरणाच्या तपासासाठी विशेष पथक नेमून सखोल चौकशी करून बेरोजगार तरुणांना फसवणूक करणाऱ्या टोळीस तातडीने अटक करण्याची असलेली नितांत आवश्यकता, त्यामुळे सदरहू प्रकरणाचा तपास जलद गतीने करून दोषींना कठोर शासन करण्यास अशाप्रकारे बेरोजगार तरुणांना नोकरीची प्रलोभने दाखवून त्यांची

अग्रिम प्रत

आर्थिक लुट करण्यासाठी मुंबईत जागोजागी उघडण्यात आलेल्या प्लेसमेंट कार्यालयांवर अंकुश ठेवण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री. एकनाथराव खडसे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जळगाव जिल्हयातील भुसावळ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र दिपनगर येथे युनिट क्र. ४ व ५ चे बांधकाम पूर्ण होऊन वीज निर्मितीला सुरुवात झालेली असून त्याद्वारे मोठया प्रमाणात प्रदुषण होत असणे, या संदर्भात दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी अध्यक्ष एम.पी.सी.बी. व प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांचेकडे केलेली तक्रार, त्याचप्रमाणे या केंद्रातून राखेच्या पाईपलाईनद्वारे राख मिश्रीत पाणी सोडून पाणी प्रदुषण होत असल्यामुळे त्या परिसरातील सिंचन योजना उध्वस्त होत असल्याची तेथील नागरीकांनी केलेल्या तक्रारी, येथील युनीट क्र. ३ ची प्रकल्प मर्यादा संपलेली असूनही सदर केंद्रातून होत असलेली विज निर्मिती, त्यामुळे मोठया प्रमाणावर हवेतील प्रदुषण होत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास येणे, परिणामी या कामी पर्यावरण पूरक आराखडा तयार करण्याची आवश्यकता, येथील राख साठवणूक स्थळ क्र. ३ चे दुरुस्तीचे कामासाठी मोठया प्रमाणावर गौण खनिजाचे उत्खनन व चोरी करुन वन विभागाचे हद्दीतून गौण खनिज उत्खनन व वाहतूक करुन शासनाचे कोट्यवधीचे नुकसान केल्याबाबत वेल्हाळे ता.भुसावळ येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेली तक्रार, याबाबत या सर्व बाबीचा विचार करता शासनाने यासंदर्भात निर्णय घेऊन या भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राद्वारे होत असलेले प्रदुषण बंद करण्याबाबत केलेली वा करावयाची उपाययोजना, तेथील नागरीकांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्यातील कोळी, महादेव कोळी, मल्हार, कोळी ढोर, आणि टोकरे कोळी, या जमातींच्यावर अन्याय होत असणे, कोळी समाज एसटी आणि एसबीसी असे दोन कॅटेगिरीमध्ये विभागले गेले असणे, ज्यामध्ये केव्हा समुद्रकिनारी राहून वंशपरंपरेने मासेमारीचा व्यवसाय करणारे सोन कोळी किंवा मच्छीमार कोळी समाजातील लोकांना एसबीसी मध्ये समाविष्ट करण्यात आलेले असणे असे असताना सुद्धा समुद्रकिनाऱ्या व्यतिरिक्त इतर प्रत्येक जिल्ह्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी, ढोर कोळी, डोंगर कोळी यांना एसटीच्या सवलती देण्यात येत नसणे, जर आदिवासी क्षेत्राबाहेर

असुधारित प्रत

राहणाऱ्या आदिवासींना आदिवासी विकास विभाग बोगस समजत असेल तर राज्यामध्ये अनुसूचित जमातीच्या एकूण लोकसंख्या ९.३५% (१,०५,१०,२१३) असणे ज्यामध्ये आदिवासी क्षेत्रामध्ये (STP ) ३.९% (४३,७२,००७ तर आदिवासी क्षेत्राबाहेर (OTSP) ५.४% (६१,३८,२०६ ) लोकसंख्या असणे, महाराष्ट्र मध्ये एकूण ९.३५ % लोकसंख्या असल्याकारणाने अनुसूचित जमातीच्या आरक्षणापासून एकूण २५ आमदार आणि चार खासदार निवडून येत असणे, ज्यामध्ये आदिवासी क्षेत्रातील ३.९% लोकसंख्येमुळे ११ आणि २ खासदार तर आदिवासी क्षेत्राबाहेरील ५.४% लोकसंख्येमुळे १४ आमदार आणि दोन खासदार निवडून येत असणे, जर आदिवासी क्षेत्राबाहेर राहणारे ५.४ % लोक ३० ते ३३ जमाती बोगस असल्यास, त्यांच्या लोकसंख्येच्या आधारावर निवडून येणारे १४ आमदार आणि दोन खासदार सुद्धा नैसर्गिकपणे बोगस ठरत असणे, त्यामुळे राज्यातील कोळी, महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर आणि टोकरे कोळी या जमातीवर होत असलेला अन्यायाविषयी तोडगा काढण्याची मागणी निवेदनाद्वारे दिनांक १६/९/२०२२ रोजी राज्याचे आदिवासी विकास मंत्री यांना आदिवासी कोळी जमात सामाजिक संस्था, खानापुरे यांच्या कडून करण्यात येणे, उक्त मागणीच्या अनुषंगाने योग्य ती उपाययोजना करण्याची आवश्यकता."

(७) **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील तुर्काबाद खराडी येथून नागझरी नदी वाहत असणे, सदर नदीचे पात्र किमान १०० फुटाचे असणे, सदर नदी पात्र बारामाही वाहत असून पावसाळयात पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने परिसरातील नागरिकांना नदी ओलांडणे अवघड जात असणे, तुर्काबाद, राजुरा, शेरोडी, मलकापुर, डोमेगांव, बोरगांव सह येसगांव येथील लोकसंख्या किमान २५ हजार असणे, सदर परिसरातील ग्रामस्थांना वाळुज औद्योगिक परिसरात जाण्यासाठी हाच एकमेव रस्ता असणे, नदी पात्रात पाणी असल्याने पादचारी व दोन चाकी वाहनास नदी ओलांडून जाण्यासाठी त्रास सहन करावा लागत असणे, मागील दोन वर्षापुर्वी शेतातून घरी पायी येत असतांना नदी ओलांडतांना पाण्याचा अंदाज न आल्याने ३५ वर्षीय एका शेतक-याला जीव गमवावा लागला असणे, सततच्या पावसाने नदीपात्रात नेहमी मोठया प्रमाणावर पाणी वाहत असणे, वाळूज औद्योगिक वसाहतीत कामगारांना जाण्यासाठी कायमच अडचणी येत असणे, तुर्काबाद खराडी परिसरातील शेतकरी,कामगार व शाळेकरी मुलांना येण्याजाण्यासाठी सदर नागझरी नदीवर पुल बांधणे अत्यंत गरजेचे असणे, सदर ठिकाणी पुलाचे बांधकाम करण्यासाठी होत असलेली मागणी, याबाबतीत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

अस्वीकृत प्रत

(८) **श्री. शशिकांत शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सातारा जिल्हयातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणी करण्यासाठी कृष्णानगर पाटबंधारे वसाहतीमध्ये कृष्णा खोरे विकास महामंडळाची सुमारे ६३ एकर जागा या महाविद्यालयासाठी देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, जून २०२२ मध्ये पोलिस प्रशासन व कार्यकारी अभियंता धोम कालवे विभाग क्र. २ यांनी व काही अधिकारी व बाहेरच्या लोकांनी संयुक्त मोहिम राबवून या जागेत असलेल्या सुमारे ४५ वर्षापासूनचे व्यापारी गाळे, ४७ कार्यालयीन इमारती, १२ तात्पुरते गोडाऊन व १२३ निवासी इमारतीचा समावेश असलेल्या या वास्तु पाडण्यास सुरुवात करणे, जुन्या इमारती, गोडाऊन व दुकाने पाडल्यानंतर लोखंडी स्टील, विटा व अन्य बांधकाम साहित्याची निविदा प्रक्रिया न काढता किंवा लिलाव न करता या भंगार मालाची अनधिकृतपणे विक्री करुन कोट्यवधी रुपयाचा केलेला भ्रष्टाचार या संदर्भात काही सामाजिक संघटनांनी चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्याची जिल्हाधिकारी, सातारा यांना दिलेले निवेदन, या संदर्भात चौकशी करुन संबंधिताविरुध्द कारवाई करण्याची तेथील लोकप्रतिनिधींसह इतर सामाजिक संघटनांनी केलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

(९) **सर्वश्री विक्रम काळे,** सतिश चव्हाण, नागोराव गाणार, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, प्रवीण दटके, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील कायम शब्द वगळलेल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व वर्गतुकड्यांची पुन्हा मंत्रालय स्तरावरुन तपासणी करणे, तपासणीअंती त्रुटी पूर्ण केलेल्या शाळांची यादी घोषित करण्यासाठी शिक्षक लोकप्रतिनिधींनी वारंवार पाठपुरावा करणे, तत्कालीन सरकारने या याद्या घोषित करण्यासाठी मान्यता देणे, त्या सर्व शाळांचे शासन निर्णय शिक्षण विभागाकडून तयार होणे, तरीही शासन निर्णय निर्गमित न होणे, तत्कालीन आघाडी सरकारने सन २०११ मध्ये विनाअनुदान शाळांना अनुदान देण्यासाठी मान्य केलेले प्रचलित धोरण पहिल्या वर्षी २०%, दुसऱ्या वर्षी ४०%, तिसऱ्या वर्षी ६०% व चौथ्या वर्षी ८०% व पाचव्या वर्षी १००% अनुदान याप्रमाणे वेतन अनुदान देण्याचा निर्णय न होणे, मुल्यांकन निकषानुसार तपासणीअंती अनुदानास पात्र ठरणाऱ्या अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच सन २०१२-१३ च्या वर्गतुकड्यांना वेतनअनुदानासाठी पात्र ठरवून शिक्षण आयुक्तांमार्फत प्रस्ताव शासनास सादर होणे, तरीही शासन स्तरावरुन सदरील शाळा व वर्ग

अग्रिम प्रत

तुकड्या अनुदानासाठी घोषित न होणे, या सर्व कायम शब्द वगळलेल्या शाळेतील शिक्षक-कर्मचाऱ्यांना सेवासंरक्षण देणे, यासाठी शिक्षक लोकप्रतिनिधी सातत्याने शासनाकडे पाठपूरावा करणे, राज्यातील शिक्षक-कर्मचारी आझाद मैदानावर वेळोवेळी आंदोलन करणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **श्री. किरण सरनाईक**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक समस्या असून यामुळे हे कर्मचारी तणावपूर्ण वातावरणात काम करत असणे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पद भरती रखडलेली असणे, राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन व कोविड काळापासून प्रलंबित असलेले वैद्यकीय देयकासाठीच्या निधीची तरतूद अद्याप केलेली नसणे, डी.सी.पी.एस/एन.पी.एस. खाते नसणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाचा हप्ता रोखीने मिळत नसणे, डी.सी.पी.एस/एन.पी.एस. खाते धारकांना ६ व ७ व्या वेतन आयोगाची थकबाकी मिळत नसणे, राज्यातील ० ते २० पट संख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, यामुळे विद्यार्थी व शिक्षक दोघांचेही नुकसान होणार असणे, तरीही शासन हा निर्णय मागे न घेणे, नगर परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजनाचा लाभ मिळत नसणे, राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित शाळामधील पूर्णवेळ शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रत्येकी २ मुलांना नि:शुल्क शिक्षण देण्याबाबत अद्याप निर्णय न होणे, राज्यात बृहत आराखडा शिवाय कुठल्याही स्वयंअर्थसहाय्यित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयांना मान्यता न देण्याबाबतही शासनामार्फत कोणताही निर्णय अद्याप न होणे, परिणामी राज्याचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-पालकांमध्ये शासनाच्या या शैक्षणिक उदासीन धोरणामुळे शासनाप्रती चिडीची व संतापाची भावना निर्माण होणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या या विविध समस्या तातडीने सोडवण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(११) **श्री. महादेव जानकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"माहे नोव्हेंबर,२०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास कल्याण

(पूर्व) चेतना शाळा ते नेवाळी नाका श्रीमलंग रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून, त्यास जबाबदार असलेले संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांनी संगनमताने ३० ते ४० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे गंभीर आरोप तसेच कंत्राटदाराला काळया यादीत टाकून जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मनपा आयुक्त तसेच कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग यांचेकडे दिनांक ४/१०/२०२१ पासून वारंवार केलेली लेखी मागणी, सदर रस्त्याचे काम मनपा कडून मे.रेल्कॉन इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि. या कंपनीला देण्यात येणे. मुंबई मनपाचे ब्लॅक लिस्टेड केलेल्या कंपनीला सदर काम दिल्याची बाब उघडकीस येणे, दि १३/४/२०१७ रोजी काम दिल्यानंतर दि १२/९/२०१८ पर्यंत काम पूर्ण करण्याचे आदेश असतांनाही दि ३१/०५/२०२१ पर्यत देण्यात आलेली मुदतवाढ, मूळ रकमेत ४ कोटी रुपये कंत्राटदाराला वाढवून देणे, सदर रस्त्याचे करण्यात आलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून संपूर्ण कामाची चौकशी तातडीने करण्यात यावी व काळया यादीतील कंत्राटदाराला काम मंजूर करणाऱ्याना मनपा तसेच सा.बां.विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी कंत्राटदार कंपनीबरोबर आर्थिक हातमिळवणी केल्यामुळे या रस्त्याचे काम न करताच सदर ४६ कोटी रुपये इतक्या रकमेचा अपहार या ठेकेदार कपंनीने केल्याचे उघडकीस आल्यामुळे कल्याण-डोंबिवलीमधील लाखो नागरिक, या रस्त्यावरुन प्रवास करणारे प्रवासी व वारंवार तक्रार करणारे लोकप्रतिनिधी यांचे मनात कल्याण -डोंबिवली मनपा प्रशासन व कार्यकारी अभियंता यांनी ठेकेदारांशी आर्थिक हातमिळवणी केल्याबददल निर्माण झालेला ठाम विश्वास, चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ व बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१२)] —**

**(१२)** **श्री. अंबादास दानवे,** ॲड.अनिल परब, श्री अभिजित वंजारी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे तुडाळ येथील सर्व्हे नं.१४/१, सव्हे नं.१३/२/१, १६/२, ही जमिन सरकारी अकारीपड असून महसूल व वन विभाग यांच्याकडील शासन निर्णय दि.२३.१.२०१९ अन्वये शासकीय जमिनीवर लिलाव पद्धतीने खारपट्टा देण्याची तरतूद असणे, मौजे तुडाळ येथील स.नं.ग.नं.१६/१, एकूण क्षेत्र १४.४७.० हेक्टर आर पैकी १.००.० हेक्टर आर या खाणपट्टा जमिनीकरीता दि.३१.३.२०१६ अन्वये मंजूर करण्यात येणे, परंतु लिलाव पद्धतीने खाण धारकाबाबत खनिज खाणपट्टा नुतनीकरणाचे आदेश व्यपगत झालेले असणे, याबाबतची टिपणी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी मंजूर केलेली असून मा.अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे स्वाक्षरीकरीता दि.३१.१२.२०१९ करीता सादर करण्यात येणे, याबाबत मा.अप्पर

जिल्हाधिकारी यांनी आजतागायत ती अनिर्णीत ठेवण्यात येणे, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी केलेल्या मोजणीच्या अनुषंगाने खाणधारकाने एकूण १,०६,८८३ ब्रास उत्खनन केल्याचे निदर्शनास येणे, सदर खाणीमध्ये उत्खननाकामी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांचेकडील माहे मार्च २०२० पर्यंत विद्युत देयक व होणारा वीज वापर यांचे विवरणपत्र सादर करण्यात येणे यावरून सदर अनधिकृत उत्खनन आजमितीस सुरू असणे, त्यानुषंगाने खाणधारकास दंडात्मक आदेश काढून तात्काळ दंडात्मक रक्कम शासनास जमा करण्याबाबत कळविलेले असणे, मा.जिल्हाधिकारी रायगड यांजकडील पत्र जा.क्र.खशा/कात-१/ईटीएस मोजणी/तुडाळ/२०१८, दि.२.०८.२०१८ व पत्र क्र.गौखशा/कात-१/तुडाळ/मा.म.दळवी/अन.उत्खनन/२०२०, दि.१९.०५.२०२० अन्वये सदर प्रकरणी सुनावणी घेण्याकामी उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांना प्राधिकृत करण्यात आले असणे, तद्नंतर मा.अप्पर जिल्हाधिकारी रायगड यांजकडील पत्र क्र.गौखशा / कात-१ / तुडाळ / दळवी / अन.उत्खनन/ २०२०, दि.१५.१०.२०२० अन्वये (परिशिष्ट-२४) सदर प्रकरणी या कार्यालयाकडील मूळ संचिकासह उपविभागीय अधिकारी पेण यांच्याकडे वर्ग करण्याबाबत आदेशित केलेले होते. सद्य:स्थितीत सदरचे प्रकरणे या कार्यालयाकडील पत्र दि.२०.११.२०२० अन्वये उपविभागीय अधिकारी, पेण यांचे कार्यालयात वर्ग करण्यात आली असणे, परंतु सदर प्रकरण हे उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्याकडे पुन्हा वर्ग करण्यात येणे, सबब याबाबत कोणताही आदेश न झाल्याने महाराष्ट्र शासनाचा १५ कोटी ३१ लाख ११ हजार ३२५ हून अधिक दंडात्मक रक्कम खाणधारकाने न भरल्याने शासनाचा महसूल वसूली कामी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना)** — **[अनुक्रमांक (१३)]** —

**(१३) श्री. राजेश राठोड**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अखिल बंजारा समाजाचे तिर्थक्षेत्र असलेले वाशिम जिल्हयातील पोहरादेवी हे स्थान बंजारा समाजासाठी श्रध्दास्थान असणे, पोहरादेवी या ठिकाणी बंजारा समाजातील नागरिक मोठया संख्येत दररोज दर्शनासाठी येत असून या ठिकाणी बंजारा कुंभ घेणे आवश्यक असतांना अखिल भारतीय धर्मजागरण समन्वय या संघटनेद्वारे जानेवारी, २०२३ मध्ये गोद्री ता. जामनेर जिल्हा जळगांव येथे कुंभमेळयाचे आयोजन करण्यात आलेले असणे, शासनाने हिंदुगोर बंजारा व लबाना नायकडा कुंभकरिता पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा व मलनिस्सारण शौचालय व स्नानगृह यासाठी सुमारे ४ कोटीपेक्षा जास्त निधीची मंजूरी दिलेली

असून शासनाचे १०० कोटी पेक्षा जास्त निधी खर्च करण्याची तयारी असणे, वास्तविक हिंदु कुंभमेळा अलाहाबाद, नाशिक, हरिद्वार, उज्जैन अशा ठराविकच तीर्थक्षेत्रामध्ये भरविला जात असणे, असे असताना गोद्री जामनेर या ठिकाणची निवड कोणत्या आधारे करण्यात आली तसेच केवळ हिंदु धर्म व्यापक असल्याने हिंदु बंजारा कुंभ आयोजित करुन बंजारा जमाती करिता मर्यादित का ठेवण्यात आला याबाबत जनमानसात होत असलेली चर्चा, शासनाच्या निधीची तरतूद करताना कशाच्या आधारे कामाची निवड केली गेली, गावाची संख्या कमी भौतिक सुविधांसाठी जास्त निधी अशा प्रकारे जनतेच्या पैशाचा गैरवापर केला जात असल्याची नागरिकांमध्ये निर्माण होत असलेली शंका, या प्रकारातून पोहरादेवी या ठिकाणचे महत्व कमी करण्याचे होत असलेले प्रयत्न, सदरच्या कुंभमेळाच्या आयोजनामुळे हिंदू बंजारा असे नवीन नामकरण आयोजकांकडून करण्यात येणे, पोहरादेवी येथे पायाभूत सुविधा स्वच्छतागृह, रस्ते, पिण्याचे पाणी इत्यादीची व्यवस्था होणे गरजेचे असताना जाणीवपूर्वकपणे गोद्री येथे कुंभ भरविण्यात येत असल्याने बंजारा समाज बांधवात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची आवश्यक कार्यवाही याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**चार : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास).**

## - मध्यंतर –

**पाच : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

(१) **सर्वश्री अंबादास दानवे,** विलास पोतनीस, किशोर दराडे, वि.प.स. यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरा करण्याचा निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतलेला असणे, उक्त कार्यक्रमाअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी ७५ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता देऊनही सदरहू निधी विनावापर पडून असणे, तसेच मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन/रुपरेषा निश्चित करण्यासाठी महाविकास आघाडीच्या सरकारने गठीत केलेली मंत्रिमंडळ उपसमिती बरखास्त करुन नविन मंत्रिमंडळ उपसमिती पुर्नगठीत करण्यात आली असणे, परंतू उक्त समितीचे काम अद्याप सुरु नसणे, त्यामुळे मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरा करण्याबाबत शासनाची उदासिनता दिसून येणे, परिणामी मराठवाडयातील जनतेमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, उक्त प्रकरणी चौकशी करुन मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमत महोत्सवी वर्ष साजरा करुन

अग्रिम प्रत

त्याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री प्रविण पोटे-पाटील,** प्रविण दरेकर, निलय नाईक, प्रसाद लाड, रमेश पाटील, राजहंस सिंह, प्रविण दटके, प्रा.राम शिंदे, वि.प.स. यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यात विशेषत: अमरावती, मालेगाव, कोल्हापूर, पालघर जिल्हयात अल्पवयीन मुलींना फूस लाऊन, प्रलोभन दाखवून व काही ना काही मार्गाने आकर्षित करुन लव-जिहादच्या नावाने मुस्लिम मुलांकडून पळवून नेण्याचे प्रकार किंबहुना १८ ते २१ वयोगटातील बऱ्याचशा मुली खोटया भूलथापांना बळी पडून स्वत:हून घरच्यांच्या नकळत पळून जाण्याचे प्रकार मोठया प्रमाणावर निदर्शनास येणे, समोरील व्यक्ती मुस्लिम धर्माची असताना हिंदू धर्मातील नावे धारण करुन हिंदू मुलींना आकर्षित करण्याचे प्रकार निदर्शनास येणे, यात गुंतल्यानंतर कालांतराने पश्चाताप होऊन काही मुलींनी आत्महत्या केल्याचे प्रकार निदर्शनास येणे, जेमतेम १८ वर्षाच्या झालेल्या ज्या मुलींना त्यांच्या भविष्याचा अंदाज नाही अशा मुलींचे आयुष्य उध्वस्त होत असल्याची बाब निदर्शनास येणे, या प्रकारातील कित्येक मुली शरमेने व पश्चातापाने घरी न परतता अवैध धंद्यात गुंतल्या असल्याची बाब उघडकीस येणे, हिंदू धर्माला कलंकित करणाऱ्या मुस्लिम धर्मातील नराधमांपासून हिंदू मुलींना वाचविण्यासाठी हिंदू विवाह अधिनियमात सुधारणा करुन १८ ते २१ वर्ष वयादरम्यानच्या मुलींचे विवाह पालकांच्या संमतीने करणे अनिवार्य करण्याची व २१ वर्ष वयानंतरच्या मुलींना स्वेच्छेने विवाह करण्यास मुभा देण्याची आवश्यकता, खाजगी विवाह संस्थांच्या माध्यमातून अशा भूलथापांना हिंदू मुली बळी पडत असल्याने विवाह जुळवून लावून देणाऱ्या संस्थांवर बंदी आणण्याची आवश्यकता, असे विवाह उपनिबंधकाकडे एक महिन्याची पूर्वसूचना देऊन व नोंदणी करुन करण्याची आणि अशा विवाहास मुलींच्या आई-वडिलांनी किंवा पालकांनी उपस्थित राहणे अनिवार्य करण्याची आवश्यकता, या प्रकारांना कायमस्वरुपी आळा बसण्यासाठी राज्यात धर्मांतर विरोधी अधिनियम तातडीने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**सहा : शासकीय विधेयके –**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

(१) "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(२)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(३)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२.

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(४)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – आयटीएम कौशल्य विद्यापीठ, नवी मुंबई विधेयक, २०२२.

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – आयटीएम कौशल्य विद्यापीठ, नवी मुंबई विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात

यावे."

**(५)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ – स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (सुधारणा) विधेयक, २०२२"
**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**
"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ – स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**सात** : **सर्वश्री अंबादास दानवे**, शशिकांत शिंदे, डॉ. सुधीर तांबे, ॲड.अनिल परब, सर्वश्री एकनाथराव खडसे, अभिजीत वंजारी, सचिन अहिर, सुनिल शिंदे, सतेज उर्फ बंटी पाटील, राजेश राठोड, विलास पोतनीस, अमोल मिटकरी, जयंत आसगावकर नरेंद्र दराडे, सतीश चव्हाण, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री वजाहत मिर्झा, जयंत पाटील, विप्लव बाजोरीया, अनिकेत तटकरे, आमश्या पाडवी, अरुण लाड, अब्दुलाखान दुर्राणी, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव –**

"राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्थेची स्थिती गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यात सरकारला आलेले अपयश, राज्यात अवैध धंद्यात तसेच महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, अनुसूचित जमातीच्या महिलेवरील बलात्कार व हत्येचा गुन्हा दडपण्याचा पोलिसांकडून झालेला प्रयत्न, वेठबिगारीसाठी अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींच्या खरेदी-विक्रीच्या उघडकीस आलेल्या घटना, बालगृहात होणारे मृत्यू, सत्तारुढ लोकप्रतिनिधीच्या आक्षेपार्ह वक्तव्यांमुळे राजकीय गुंडगिरीला मिळालेला अभय, राजकीय कुरघोडीतून होत असलेले गुन्हे, प्रशासकीय यंत्रणा, पोलीस दल व केंद्रीय यंत्रणांचा राजकीय सुडबुध्दीने होत असलेला गैरवापर, सत्तारुढ पक्षाच्या लोकप्रतिनिधींच्या सुरक्षेसाठी निर्भया पथकातील वाहनांचा गैरवापर करणे, विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधींवर खोटे आरोप ठेऊन त्यांना जेलमध्ये डांबून ठेवणे, सत्तारुढ पक्षाच्या लोकप्रतिनिधींकडून विरोधी पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांना धमक्या देणे, तसेच त्यांच्यावर खोट्या पोलीस केसेस दाखल करणे, अतिरेकी हल्ल्याच्या धमक्यांचे सत्र सुरु असून लोकप्रतिनिधी व उद्योजकांनाही धमक्या आल्या असणे, यामुळे महाराष्ट्रातील सर्व गोरगरीब जनतेमध्ये निर्माण झालेले असुरक्षिततेचे व भीतीचे वातावरण, गत सहा महिन्यांच्या कालावधीत महाराष्ट्रातील महापुरुषांचा अवमान

करणारी, महाराष्ट्राच्या भूमीचे विभाजन करणारी महाराष्ट्राच्या स्वाभिमानाशी खेळणारी, महाराष्ट्र हिताशी प्रतारणा करणारी वक्तव्ये, निर्णय, कृती सांविधानिक पदावर असलेल्या व्यक्तींकडून महाराष्ट्रात घडल्या असणे, यामुळे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला तडा गेल्याची भावना जनमानसात निर्माण झाली असणे, अर्धन्यायिक प्रकरणात पदाचा दुरुपयोग केल्याची तसेच मंत्र्यांची व प्रशासकीय यंत्रणांची अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणे उघडकीस आली असणे, तसेच, राज्य परिवहन महामंडळाच्या जुन्या बसेसची दुरवस्था झाली असून त्याजागी नवीन बस खरेदी करण्याची आवश्यकता, तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभे करण्याची घोषणा राज्यसरकारने केली असली तरी त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद केलेली नसणे, राज्यात काही शैक्षणिक संस्थांनी मान्यता न घेता फिजिओथेरपीचे अभ्यासक्रम सुरु केले असणे, राज्यावर करोना महामारीचे संकट पुन्हा घोंगावत असल्याने त्याबाबत तातडीने करावयाच्या उपाययोजना, गत ६ महिन्यात कुपोषणाचे वाढलेले प्रमाण, व्हेंटिलेटर अभावी नागपूरच्या मेडिकल हॉस्पिटलमध्ये १७ वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाला असणे, जव्हार तालुक्यातील २१ वर्षीय मातेची रस्त्याअभावी जंगलात प्रसूती होणे, स्व.बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गासारख्या महामार्गावर १०८ च्या रुग्णवाहिका, इंडिकेटर व इतर आरोग्य सुविधा उपलब्ध नसणे, राज्यात शिक्षक पात्रता परीक्षेत (टीईटी) गैरप्रकार झाले असणे, आजही दोषी उमेदवार कार्यरत असणे, कमी पटसंख्येच्या शासकीय शाळा बंद केल्यामुळे ग्रामीण, दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली असणे, शालेय पोषण आहार योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार, शासनाच्या "आपले गुरुजी उपक्रमाला शिक्षक व पालकांकडून होत असलेला तीव्र विरोध, आठवी ऐवजी तिसरीपासून परीक्षा घेण्याबाबत राज्याच्या शिक्षण मंत्र्यांनी व्यक्त केलेला मानस, परिणामी शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेली संदिग्धता, राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा स्थगित झाली असणे, सन २०२१-२२ या वर्षांचे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराला विलंब होत असणे, राज्यातील खासगी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्ग तुकड्यांतील ६५ हजार विना आणि अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना माहे जून, २०१४ व नोव्हेंबर, २०१५ मधील वेतन अनुदान वितरणाचे सूत्र लागू करण्याची होत असलेली मागणी, तसेच सरकारच्या उदासीन धोरणांमुळे गेल्या सहा महिन्यात वेदान्त फॉक्सकॉन, टाटा एअर बस, बल्क ड्रग पार्क सह अनेक उद्योग महाराष्ट्राबाहेर गेले असणे, महाराष्ट्रात गुंतवणूक होण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असणे, परिणामी महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणांच्या हिरावलेल्या रोजगाराची संधी, उद्योजकांना जमिनी वाटप करण्याच्या एमआयडीसीच्या निर्णयाला स्थगिती दिल्यामुळे हजारो लघु व

अग्रिम प्रत

मध्यम उद्योग उभारण्यात अडथळा निर्माण होणे, तसेच गरीबांसाठी राबविण्यात येत असलेली "आनंदाचा शिधा" या योजनेत झालेला भ्रष्टाचार व गैरव्यवहार, मागील सरकारनं यशस्वीपणे राबवलेल्या शिवभोजन थाळी योजनेकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या काळात अतिवृष्टी, पूर, सततचा पाऊस व अवकाळी पाऊस यामुळे राज्यातील फळपिकांचे नुकसान झाले असणे, ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या केलेल्या मागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शेतकऱ्यांना जाहिर केलेली मदत तुटपुंजी असून उक्त मदत अद्याप लाखो शेतकऱ्यांना मिळालेली नसणे, शासनाच्या उदासीनतेमुळे पीक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचे लाखो दावे नाकारुन केलेली फसवणूक, लम्पी रोगावर नियंत्रण मिळविण्यास शासनास आलेले अपयश, त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या पशुधनाचे झालेले नुकसान, त्यासाठी करावयाच्या उपाययोजना याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, राज्यात महागाईचा उसळलेला डोंब, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**आठ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री प्रवीण दटके,** चंद्रशेखर बावनकुळे, निलय नाईक, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात विशेषतः नागपूरात असणाऱ्या हलबा या अनुसूचित जमाती प्रवर्गातील नागरिकांना क्षेत्र बंधन घटनादुरुस्ती झाल्यानंतरही जात प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असणे, हलबा समाजाच्या जात वैधतेमधील अडचणी सोडविण्यासाठी शासनाने संशोधन समिती गठीत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी मागणी केलेली असणे, अनुसूचित जमातीच्या सर्व जात प्रमाणपत्रांची पडताळणी समितीवर हलबा समाजाचा अभ्यास असलेला मानव वंश शास्त्रज्ञाची सदस्य म्हणून नेमणूक होणेबाबत हलबा समाजाच्या वतीने वारंवार मागणी होत असणे, अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील मागील १५ वर्षांत जात वैधता व अवैधता ठरलेल्यांची यादी जाहीर होणे तसेच केंद्र शासनाने आदिवासींचे क्षेत्रबंधन १९७६ ला हटविल्यानंतर वर्ष १९५० च्या पूर्वीचे पुरावे सादर होण्याची अट रद्द होणेबाबत हलबा समाजाच्या वतीने मुंबई येथे करण्यात आलेले तीव्र आंदोलन, समाजात वाढत जाणारा तीव्र असंतोष, हलबा समाजाच्या जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याची अडचणी दूर होणे व इतर समस्यांबाबत शासनाने उच्चस्तरीय समिती नेमून करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री रामदास आंबटकर,** नागोराव गाणार, चंद्रशेखर बावनकुळे, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात यावर्षी अतिवृष्टीबाधित क्षेत्रात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना रब्बी हंगामाकरीता शासनाकडून ५० टक्के अनुदानावर ३० किलो वजनाची चना बियाणाची बॅग देण्यात येणे, सदर बियाणे महाबीज कंपनीव्दारे पुरवठा होणे, परंतु शेतकऱ्यांना पुरवठा केलेला चणा हा निकृष्ट दर्जाचा, टोचलेला देण्यात आल्याचे उघड होणे, सदर चणा बॅगची किंमत मार्केटपेक्षा दिड पट/दुप्पट असून शेतकऱ्यांना अनुदान स्वरूपात १५०० रूपयांचे वाटप केले जाणे, परंतु सदर चणा निकृष्ट असल्याने शेतकऱ्यांची एकप्रकारे महाबीजकडून फसवणूक होणे, त्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी करुन निकृष्ट दर्जाची चणा डाळ दिड पट/दुप्पट दराने वितरीत करणाऱ्या महाबीज कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याची शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**नऊ : "निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप"**

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : २८ डिसेंबर, २०२२

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

अस्थायी प्रत